जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 OCT 2019
तरुण भारत

# 'स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा विकास'

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना पुस्तकांपलीकडे जाऊन विचारमंथन करण्यासाठी विविध स्पर्धांची नितांत गरज असते. या स्पर्धांमुळेच विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास होतो. तसेच वक्तृत्व स्पर्धा हे आयुष्य जगण्याचे साधन आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. डी. बी. पाटील सांस्कृतिक समिती व न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील होते.

कुलगुरू म्हणाले, वक्तृत्व चांगले असेल तर तो विद्यार्थी हजारजबाबी असतो. आयुष्यात कोणत्याही प्रसंगाला तोंड देऊन मार्ग काढण्याची त्याची तयारी असते. म्हणून या स्पर्धा महत्वाच्या आहेत. सूत्रसंचालन डॉ. एस. एच. शेटके, मनीषा नायकवडी यांनी, डॉ. कविता गगराणी यांनी आभार मानले.

# वक्तृत्व गुण आयुष्य जगण्याचे साधन : कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा बहुआयामी विकास होण्यास मदत होऊन जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो. वक्तृत्व गुण आयुष्य जगण्याचे साधन आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

न्यू कॉलेज व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील होते.



**कोल्हापूर : राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. प्रा. विनय पाटील, डॉ. डी. आर. मोरे आदी.**

डॉ. शिंदे म्हणाले, सध्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या पलीकडे जाऊन विचारमंथन करण्यासाठी यासारख्या स्पर्धांची आवश्यकता आहे. जीवनकौशल्ये विकसित होण्यासाठी जाण, भान आणि मान या त्रिसूत्रींची गरज आहे.

यावेळीविद्यापीठाचेमाजीशैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, संस्थेचे उपाध्यक्ष आर. डी. पाटील (वडगावकर) सांस्कृतिक कार्यक्रम समिती प्रमुख विनय पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.एस. एच. शेटके, यू. के. गायकवाड, मनीषा नायकवडी यांनी केले. स्पर्धेच्या समन्वयक डॉ. कविता गगराणी यांनी आभार मानले.

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांची तयारी पूर्ण

- ६०० परीक्षांचा समावेश
- तीन जिल्ह्यांतून अडीच लाख विद्यार्थी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १५ ऑक्टोबरपासून हिवाळी सत्र परीक्षांना प्रारंभ होणार आहे. परीक्षा विभागाकडून तयारी पूर्ण झाली असून विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे अडीच लाख विदयार्थी परीक्षेला बसणार आहेत.

परीक्षा विभागाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षांचे नियोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांत १५ रोजी बी.ए., बी.एस्सी., व एम.ए.(भाषा) विषयाच्या परीक्षा सुरू होणार आहेत. परीक्षेच्या सुमारे पाच हजार प्रश्नपत्रिपका 'एसआरपीडी' मोडद्वारे ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात येणार आहेत. बी.ए.भाग-१ ते ४ प्रश्नपत्रिका छापील स्वरूपात महाविद्यालयांना पाठविण्यात आल्या आहेत.

'एसआरपीडी' मोडद्वारे पाठविण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकांची १२ ऑक्टोबर रोजी 'मॉक टेस्ट' घेण्यात आली. परीक्षा विभागाकडून तयारी पूर्ण झाली असून महाविद्यालयांना परीक्षेसंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.